# विदेशी शास्त्रज्ञांची विद्यापीठाला भेट

***नगर प्रतिनिधी* / १९ नोव्हेंबर**

**अमरावती** : आंतरराष्ट्रीय स्पायडर परिषदेसाठी अमरावतीला आलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त शास्त्रज्ञांशी कुलगुरू डॉ.मोहन खेडकर यांनी विद्यापीठ अतिथीगृहात चर्चा केली. चर्चेदरम्यान विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक विभाग, विकासात्मक कार्यक्रम, संशोधन, विद्यार्थ्यांकरिता असलेल्या विविध सुविधा, अभ्यासक्रम, तद्वतच विद्यापीठाद्वारे राबविल्या जात असलेले विविध उपक्रम आदींची माहिती कुलगुरूंनी यावेळी दिली.

पाहुण्यांनी विद्यापीठ परिसराची पाहणी केली. निसर्गरम्य परिसर, स्वच्छता, विविध प्रकारची वृक्षवल्ली, सुंदर रस्ते, उद्याने, क्रीडांगणे आणि परिसरातील जलबंधाऱ्यांची पाहणी केली. विद्यापीठाचा निसर्गरम्य सुंदर परिसर, स्वच्छता, विकास कामे, प्रदुषणमुक्त आणि एकसंध परिसराबद्दल विदेशातील पाहुण्यांनी कौतुकाचा वर्षाव केला. यावेळी कुलसचिव डॉ.अजय देशमुख यांनी प्रशासकीय प्रणालीबाबत पाहुण्यांना माहिती दिली.



**विद्यापीठातील परिसराची पाहणी करताना शास्त्रज्ञ**

याप्रसंगी विदेशातील इजिप्तच्या कैरव येथील हिशांत हेनावे, रशियाचे डॉ.युरी मारूसिक, नेदरलॅंडचे पीटर कुमन, सिंगापूरचे जोसेफ के. एच. कोह, जपानचे डॉ.हिरोत्सुगु वन, जर्मनीचे डॉ.पिटर जॉगर आदी शास्त्रज्ञांसह परीक्षा नियंत्रक डॉ.जे. डी.वडते, वित्त व लेखाधिकारी डॉ. शशीकांत आस्वले, विद्यापीठ ग्रंथपाल डॉ.मोहन खेरडे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ.गणेश मालटे, प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा, संचालक डॉ.श्रीकांत पाटील, उपकुलसचिव प्रवीण राठोड याशिवाय प्राणीशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ.जी.एन.वानखेडे उपस्थित होते.

ती
र्क करा
जिल्हा कार्यालय : दैनिक देशोन्नती, गुलशन आर्केड रेल्वे स्टेशन चौक, अमरावती. फोन
Email-amtdesh@gmail.com , amtdesh@Rediffmail.co
जाहिरात विभाग मोबाईल - 9822593927, वितरण विभाग मोबाईल - 9921009639

देशोन्नती दि०२०/११/१२